महाराष्ट्र शासन

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,

महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई - ४०० ००१.

**क्रमांक : व्यशिप्र-२०२२/आस्था-२/प्र.क्र.२३/पदभरती/का-४** **दि.०८-०३-२०२३**

## परिपत्रक क्र.६

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अधिपत्याखालील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील (Govt. ITI) विविध व्यवसायातील शिल्प निदेशक (Craft Instructor) (गट-क) संवर्गातील १४५७ पदे भरण्याकरिता दि.१७/०८/२०२२ रोजी www.dvet.gov.in या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती.

सदर जाहिरातीच्या अनुषंगाने दि.२८ व २९/०९/२०२२ रोजी झालेल्या सामायिक परीक्षेत (CBT-१) (Normalization-Mean Standard Deviation Method नुसार) किमान ४५% गुण प्राप्त करून ४५११३ उमेदवार व्यावसायिक चाचणी (CBT-२) करिता पात्र ठरल्याचे व किमान ४५% गुण प्राप्त न केल्यामुळे व्यावसायिक चाचणी (CBT-२) तसेच पुढील भरती प्रक्रियेकरिता ५३६१ उमेदवार अपात्र ठरल्याचे दि.२३/०२/२०२३ रोजी जाहिर करण्यात आले असून अपात्र उमेदवारांचे Participant ID घोषित करण्यात आले आहेत. सामायिक परीक्षेचा (CBT-१) निकाल हा उमेदवाराच्या सामाजिक/समांतर आरक्षणावर आधारीत नसून उमेदवाराच्या पुढील भरती प्रक्रियेतील पात्र/अपात्रतेबाबत आहे याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. अपात्र उमेदवारांचा निकाल त्यांच्या Login ID मध्ये उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तसेच पात्र उमेदवारांना व्यावसायिक चाचणी (CBT-२) करिता अर्ज भरण्यासाठी Link त्यांच्या Login ID मध्ये उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

तरी व्यावसायिक चाचणी (CBT-२) करिता पात्र ठरलेल्या उमेदवारांनी खालील बाबींचे काटेकोर पालन करुन **दि.०८/०३/२०२३ ते १४/०३/२०२३ (रात्री ११.५९ पर्यंत)** या कालावधीत व्यावसायिक चाचणी (CBT-२) करिता ऑनलाईन अर्ज सादर करावेत.

१) व्यावसायिक चाचणी (CBT-२) करिता पात्र ठरलेल्या उमेदवारांनी ते ज्या पदाकरिता शैक्षणिक अर्हता/ अनुभव धारण करीत असतील तसेच सदर पदांची व्यावसायिक चाचणी (CBT-२) देण्यास इच्छूक असतील त्या पदांची निवड करणे, विभागनिहाय पसंतीक्रम सादर करणे व निवड केलेल्या पदांच्या प्रमाणात जाहिरातीत नमूद केल्यानुसार प्रत्येक पदाकरिता स्वतंत्र परीक्षा शुल्क अदा करणे आवश्यक राहील.

२) उमेदवाराने पदाची निवड न केल्यास/आवश्यक परीक्षा शुल्क न भरल्यास/परीक्षा शुल्क भरुनही सदर पदाच्या व्यावसायिक चाचणी (CBT-२) करिता उपस्थित न राहिल्यास सदर पदाच्या गुणवत्ता यादीकरिता उमेदवाराच्या नांवाचा विचार केला जाणार नाही. तसेच या संदर्भात कोणत्याही स्वरुपातील (ऑनलाईन/ऑफलाईन/ई-मेल/SMS/Whatsapp/टपालाने/हस्तदेय) तक्रार/विनंती विचारात घेतली जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३) भरती प्रक्रियेत उमेदवार अंतिम निवडसूचीकरिता पात्र ठरल्यास उमेदवाराने संबंधित पदाकरिता ज्या विभागाचा पसंतीक्रम सादर केला असेल, केवळ त्याच विभागातील संबंधित पदाच्या निवडसूचीकरिता उमेदवाराचा विचार करण्यात येईल. उमेदवाराने पसंतीक्रम सादर न केलेल्या विभागातील संबंधित पदाच्या निवडसूचीकरिता उमेदवाराचा विचार केला जाणार नाही अथवा पसंतीक्रम सादर करण्याकरिता/पसंतीक्रमात बदल करण्याची संधी उपलब्ध राहणार नाही. तसेच या संदर्भात कोणत्याही स्वरुपातील (ऑनलाईन/ऑफलाईन/ई-मेल/SMS/Whatsapp/टपालाने/हस्तदेय) तक्रार/ विनंती विचारात घेतली जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

४) उमेदवाराने परीक्षेकरिता आवश्यक शुल्क अदा न केल्यास उमेदवार सदर पदाच्या व्यावसायिक चाचणी (CBT-२) करिता अर्ज करण्यास इच्छूक नसल्याचे समजण्यात येईल व सदर पदाच्या पुढील भरतीप्रक्रियेतून उमेदवार बाद होईल. तद्नंतर या संदर्भात कोणत्याही स्वरुपातील (ऑनलाईन/ ऑफलाईन/ई-मेल/SMS/Whatsapp/टपालाने/हस्तदेय) तक्रार/विनंती विचारात घेतली जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

५) उमेदवाराने अर्ज भरुन आवश्यक परीक्षा शुल्क ऑनलाईन अदा करुन अर्ज अंतिम केल्यानंतर उमेदवारास त्यात कोणताही बदल करता येणार नाही/बदल करण्याची संधी उपलब्ध राहणार नाही. तरी उमेदवारांनी अर्ज सादर करतांना योग्य ती दक्षता घ्यावी. तसेच या संदर्भात कोणत्याही स्वरुपातील (ऑनलाईन/ऑफलाईन/ई-मेल/SMS/Whatsapp/टपालाने/हस्तदेय) तक्रार/विनंती विचारात घेतली जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

६) उमेदवाराने ज्या व्यवसायात CITS प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करुन प्रमाणपत्र प्राप्त केले असेल केवळ त्याच पदाकरिता ऑनलाईन अर्जात "संबंधित व्यवसायातील CITS प्रशिक्षण पूर्ण केले आहे का ?" समोर "Yes" पर्यायाची निवड करुन CITS प्रमाणपत्र upload करावे करावी अन्यथा "No" पर्यायाची निवड करावी. एका व्यवसायात CITS प्रशिक्षण पूर्ण केले आहे म्हणून सर्व पदांकरिता "संबंधित व्यवसायातील CITS प्रशिक्षण पूर्ण केले आहे का ?" समोर "Yes" पर्यायाची निवड करु नये. असे केल्याचे दिसून आल्यास चूकीची माहिती दिल्याबद्दल उमेदवारास भरती प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल. उमेदवाराने CITS प्रशिक्षण पूर्ण केले असेल परंतू अर्जामध्ये "संबंधित व्यवसायातील CITS प्रशिक्षण पूर्ण केले आहे का ?" समोर "No" पर्यायाची निवड केली असल्यास अथवा CITS प्रमाणपत्र upload केले नसल्यास उमेदवाराने सदर व्यवसायातील CITS प्रशिक्षण पूर्ण केलेले नाही असे समजण्यात येईल. CITS प्रमाणपत्र upload करण्याकरिता पुनःश्च संधी उपलब्ध राहणार नाही. तसेच या संदर्भात कोणत्याही स्वरुपातील (ऑनलाईन/ऑफलाईन/ई-मेल/SMS/Whatsapp/टपालाने/ हस्तदेय) तक्रार/विनंती विचारात घेतली जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

७) व्यावसायिक चाचणी (CBT-२) चा Tradewise Syllabus व Industry ४.० Syllabus व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर (www.dvet.gov.in) उपलब्ध आहे.

८) संबंधित पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

९) ऑनलाईन अर्जाची मुदत संपल्यानंतर यथावकाश व्यावसायिक चाचणी (CBT-२) चे वेळापत्रक जाहिर करण्यात येईल.

१०) सामायिक परीक्षा (CBT-१) व व्यावसायिक चाचणी (CBT-२) अंती (Normalization-Mean Standard Deviation Method नुसार) उमेदवाराने प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे उमेदवारांची गुणवत्ता यादी

प्रसिद्ध करण्यात येणार असून उमेदवाराने सामायिक परीक्षा (CBT-१) व व्यावसायिक चाचणी (CBT-२) मध्ये एकूण २०० गुणांपैकी किमान ४५% (९०) गुण (Normalization-Mean Standard Deviation Method नुसार) प्राप्त करणे आवश्यक राहील. एकूण २०० गुणांपैकी किमान ४५% (९०) गुण (Normalization-Mean Standard Deviation Method नुसार) प्राप्त न केलेल्या उमेदवारांचा गुणवत्ता यादीमध्ये समावेश करण्यात येणार नाही. तसेच सदर उमेदवार पुढील भरती प्रक्रियेतून बाद होतील. Normalization-Mean Standard Deviation Method मुळे उमेदवारांच्या प्रत्यक्ष गुणात वाढ/घट होण्याची शक्यता असते. तरी उमेदवारांनी याबाबतची नोंद घ्यावी.

११) सदर परिपत्रक हे विविध याचिकाकर्त्यांनी दाखल केलेल्या याचिकांवरील सक्षम न्यायालयाच्या न्याय निर्णयाच्या अधिन राहून प्रसिद्ध करण्यात येत आहे.

स्वाक्षरीत/-
( दि. अं. दळवी )
संचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई-१.